RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 October 2015 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 October, 2015

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : तेरा | अंक : चौथा | ऑक्टोबर २०१५



विश्वास (सत्संग) 5

सतगुरूंचे स्वप्न (प्रश्नोत्तरे) 13

अनमोल वचन (संदेश) 19

हृदयातील तळमळ (सत्संग) 25

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



विश्वास

सत्संग: परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू अर्जुनदेवजी महाराजांची वाणी, मुंबई – ६ जानेवारी १९९७

परमपिता परमात्मा सावन–कृपालजींच्या चरणी नमस्कार करतो ज्यांनी गरीब आत्म्यावर कृपा केली व त्यांचा महिमा वर्णन करण्याची संधी दिली. आपण या नाशिवंत जगातून आपले लक्ष दूर करून त्याचा मोह सोडून युगा–युगांतरापासून अस्तित्वात असलेल्या परमात्म्यावर प्रेम करावे, जो अमर आणि सत्य आहे. परंतु जीवात्म्यासाठी अडचण अशी असते की परमात्मा अदृश्य अवस्थेत असल्याने, आपण त्यास पाहिलेले नसते मग आपण त्याच्यावर प्रेम कसे करावे? तो दयाळु परमात्मा आम्हां सर्वांच्या अंतरामध्ये स्थानापन्न आहे. आपल्या या अडचणीची त्यास चांगल्या प्रकारे जाणीव आहे की यांनी मला पाहिलेले नाही तर मग हे माझ्यावर कसे बरे प्रेम करू शकतील? परमात्मा दयेचा सागर आहे, करुणामय आहे. तो जेव्हा जीवांवर कृपा करतो, तेव्हा तो स्वत: मनुष्य देह धारण करून या संसारामध्ये येत असतो. युगा–युगांतरापासून तो जीवांसाठी संसारात येत आहे.

मी सांगत असतो की संत आपणांस मोठ–मोठ्या गोष्टी सांगण्यासाठी येत नसतात. ते केवळ याच उद्देशाने जीवांना सांगतात की आमच्या सोबत चला व स्वत: सत्याचे आकलन करून घ्या. आपण संसारात भरकटलेले जीव बहीण–भाऊ, मुले–मुली, समाज व इतर संसारिक गोष्टींच्या मोहामध्ये इतके मशगुल आहोत की आपणांस रात्री झोपेतही यांचीच स्वप्ने पडतात. आपण या सर्वांच्या मोह–बंधनामध्ये फसल्याने संतांशी आपुलकी तर सोडा, आपण त्यांचे म्हणणे देखील ऐकण्यास राजी होत नाही. तरीही संत आपणांस या संसारिक गोष्टी सांगतात, जीवनाच्या उतार–चढावाच्या गोष्टी सांगतात आणि अंतर्यात जाण्यासाठी प्रेरीत करतात.

सतगुरू स्वत: शिष्याच्या अंतरात अशा प्रकारे प्रेमाचे बीज पेरतात जसे आई स्वत:च मुलाच्या अंतरात आपल्याप्रती प्रेम निर्माण करविते. तेव्हाच मुलास जाणीव होते की ही माझी आई आहे. आई थोड्या वेळासाठी जरी मुलापासून दूर गेली, तरी ते मुल अकांडतांडव करू लागते. मुलास भलेही बोलता येत नसेल, परंतु त्यास जर विचारले की तुझी मम्मी कोण आहे? तर तो ताबडतोब आपल्या आईकडे बोट दाखवितो.

हे असे आहे की डोंगराच्या माथ्यावर उभा असलेला मनुष्य डोंगराखाली येऊन तेथे उभ्या असलेल्या मनुष्यास डोंगराची माहिती देतो की डोंगरमाथ्यावर खूप थंड वातावरण आहे, तेथे खूप वनस्पती आहे. तो याप्रकारे मधुर आणि प्रेममय गोष्टी सांगतो, डोंगरावरील जागेचे फायदे सांगतो व खाली उभ्या असलेल्या मनुष्यास आपल्या प्रेम–बंधनाने डोंगरमाथ्यावर घेऊन जातो.

माझ्या मते हे असे आहे की सुरूवाती–सुरूवातीला रसल प्रकिन्स, डेविस आणि ग्रेक मला इतर देशांचे फोटो आणि नकाशे दाखवित की ते देश किती सुंदर आहेत. ते मला विचारीत की इतके सुंदर देश तुम्ही यापूर्वी कधी पाहिले आहेत काय? मी ते ऐकून खूप हसत असे. अखेरीस एके दिवशी मी म्हणालो,''होय! कदाचित मी पाहिले आहेत.''

मी फ्लोरिडामध्ये गेलो असता तेथे मला जोन्स भेटला. त्याने मला विचारले,''संतजी! तुम्ही यापूर्वी कधी अशा प्रकारची विमानतळे पाहिली आहेत का?'' मी हसून म्हणालो,''परमात्मा कृपालजींच्या कृपेने मी कदाचित याहूनही श्रेष्ठ विमानतळे पाहिली आहेत. त्यांच्या तुलनेत ही तुच्छ आहेत.''

प्रियजनहो! त्यावेळी माझी अवस्था अशी होती की माझ्या खोलीस मी बाहेरून कुलुप लावून घेतले होते. मी कोणासही भेटत नसे. संध्याकाळी मी केवळ ८ ते ९ या वेळेमध्ये एका तासासाठीच बाहेर येत असे. हे सर्व प्रेमी हिंदुस्थानामध्ये येऊन मला भेटले आणि मला त्यांच्या देशामध्ये नेण्याचा खूप प्रयत्न केला. या सर्व प्रेमींमध्ये डेविड बेकिंसदेखील सहभागी होता,

ज्याने मला खूप मधुर गोष्टी सांगितल्या. मी त्यासर्वांच्या प्रेमाचा आदर ठेऊन त्यांच्या देशात गेलो. मी आपणांस ही घटना यासाठी सांगत आहे की जेणेकरून तुम्हाला माझे सांगणे समजून घेणे सोपे होईल. याचप्रमाणे एखाद्या परदेशी मनुष्याने तुमच्या देशात येऊन तुमच्याशी त्यादेशाच्या मधुर गोष्टी केल्या तर त्याच्या सोबतीने तुम्ही तेथे जाण्यास तयार व्हाल.

याचप्रमाणे आपली अशाप्रकारची लाचारी पाहून जेव्हा दयेचा सागर उचंबळून येतो, तेव्हा परमात्मा आम्हा मनुष्यांमध्ये मनुष्य बनून कधी कोणत्या तर कधी कोणत्या संतांच्या रूपाने या जगात येतो. तो सदैव संतरुपात येत असतो. जे जीव भाग्यशाली असतात ते जीव त्यांच्याजवळ पोहचतात. संत जगात येऊन आपणांस त्या सच्चखंडाच्या प्रेममय गोष्टी सांगतात. जे जीव संतांच्या सांगण्यावर विश्वास ठेवतात, ते संतांच्या सोबत तेथे जातात.

आत्म्यांना कल्पना असते की त्यांचे घर कोणते आहे? परंतु आत्मा मनुष्य-जन्मात येऊन मनाची सोबत घेऊन स्वत:च्या घरास विसरून गेला आहे. संत जेव्हा आत्म्यास संदेश देतात, तेव्हा त्या संदेशाचा अर्थ समजून आत्मा उन्नतीच्या मार्गावर निघतो आणि स्वगृही पोहचतो.

संत या जगात ना एखादा नवीन धर्म बनविण्यासाठी येतात ना अगोदर अस्तित्वात असलेला धर्म भंग करण्यासाठी येतात. ते या जगात मोठ-मोठे आश्रम उभारण्यासाठीदेखील येत नाहीत. ज्या आत्म्यांची परमात्मा भेटीची वेळ झालेली असते व ज्यांना सच्चखंडामध्ये माघारी बोलावण्याचा निर्णय परमात्म्याने घेतलेला असतो अशा मार्गावरून भटकलेल्या आत्म्यांना ते केवळ त्यांच्या खऱ्या घराची आठवण करून देण्यासाठी येतात. सुरूवातीपासूनच महात्म्यांना कल्पना असते की त्यांनी कोण-कोणत्या आत्म्यांना नाम द्यावयाचे आहे. त्या आत्म्यांना कोणाद्वारे स्वत:कडे आणावयाचे आहे किंवा त्यांच्याकडे स्वत: जावयाचे आहे. ही योजना त्यांनी अगोदरच केलेली असते. कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींची, टेलिव्हिजन अथवा प्रचाराची त्यांना गरज नसते.

आजचे युग जाहिरातींचे युग आहे. सुरूवातीला मी जेव्हा १६ पी.एस. आश्रमातून बाहेर पडत असे तेव्हा वाटेत ठिक-ठिकाणी चित्रपटांचे बोर्ड लावलेले असत. परंतु आजकाल ते सर्व गायब झाले असून ठिक-ठिकाणी महात्म्यांचे बोर्ड लागले आहेत. मी पप्पुस नेहमी सांगत असतो की आजकाल महात्म्यांचा बोल-बाला आहे. असा एकही चौक नाही जेथे महात्म्यांचे फोटो वा बोर्ड लागलेले नाहीत.

सर्व प्रेमींना कल्पना आहे की किती तरी आत्मे परमात्मा कृपालच्या नामाद्वारे जागृत झाले आहेत. मी नुकताच अमेरिकेतील संतबाणी आश्रमामध्ये सत्संग करून आलो होतो तर तेवढ्यात शम्स आश्रमातील प्रेमींनी सांगितले की आम्ही यापेक्षा अधिक प्रेमींची व्यवस्था करू शकत नाही. आणखी किती प्रेमी येणार आहेत? आम्ही त्यांची व्यवस्था कशी करू शकू? विचार करा! मी तर कधी बाहेर प्रचार केला नाही किंवा जाहिराती दिलेल्या नाहीत. ज्यांना जोडावयाचे आहे त्या आत्म्यांना अंतरातूनच परमात्मा कृपाल माहिती देत आहेत. परमात्म्याचा कृपा-सागर जेव्हा उचंबळून येतो तेव्हा तो एखाद्या महात्म्यांच्या रूपाने येऊन आत्म्यांमध्ये स्वत:च प्रेमाचे बीज पेरतो; सत्संगाचे पाणी देऊन त्यांना हिरवेगार करतो.

आपला एखादा दुरावलेला खास प्रिय साथीदार अचानक भेटल्यास आपणांस किती आनंद होतो! आत्म्यास कल्पना असते की माझा प्रियकर कोण आहे? माझे कोणते घर आहे? आणि मी कोठून आलेलो आहे? जेव्हा आत्म्याची परमात्म्याशी भेट होते, तेव्हा तो आत्म्यास आठवण करून देतो की बेटा! तू मार्गावरून भटकलेला आहेस, तू माझे मूल आहेस. कारण आत्मा सतनाम परमात्म्याचे अपत्य आहे. संत परमात्म्याचे प्रेषित असतात. ते समुद्रातून लाट बनून येतात. आत्मा त्या समुद्राचा एक थेंब आहे. थेंबही पाणी आहे, लाटही पाणी आहे तसेच समुद्रदेखील पाणीच आहे. तिघांमध्ये फरक जर काही असेल तर तो एकमेकांपासून झालेल्या दुराव्याचा आहे.

माझा बालपणापासूनच खूप **विश्वास** होता, मी आयुष्यामध्ये हृदयात **विश्वास** ठेऊनच वाटचाल करीत आलो. त्या विश्वासामुळेच परमात्मारूपी कृपाल माझ्या गृही आले तेव्हा ते म्हणाले होते, ''याच्या अंतरामधून सुगंध दरवळेल आणि तो सुगंध समुद्रापलिकडे जाईल.'' हे परमात्मा कृपालजींचे वाक्यच सर्व प्रेमींना अंतरात माहिती देते. हे वाक्यच माझी पब्लिसिटी आहे. तुमच्या समोर गुरू अर्जुनदेवजी महाराजांची वाणी सादर केली जात आहे, ती काळजीपूर्वक ऐकण्यासारखी आहे.

कवन गुन प्रान पति मिलउ मेरी माई।।

जेव्हा एखाद्या प्रेमी आत्म्याच्या अंतरामध्ये परमात्मा भेटीची तळमळ निर्माण होते, तेव्हा तो आत्मा परमात्म्यापर्यंत पोहचलेल्या साधू-संतांचा शोध घेऊ लागतो. जेव्हा त्या आत्म्यास दुसरा परमात्म्याचा प्रिय आत्मा भेटतो, तेव्हा तो त्यास विचारतो,''बांधवा! मला परमात्मा भेटीसाठी कोणते गुण धारण करणे आवश्यक आहेत? तो कोणती भेट स्वीकार करतो? त्याची पूजा-अर्चना कशी करावी ज्यामुळे मला तो प्राप्त होईल?'' तेव्हा दुसरा आत्मा उत्तर देतो:

रूप हीन बुधि बल हीनी मोहि परदेसनि दूर ते आई।।

तो आत्मा सांगतो मी स्वरूपवान नाही. माझ्या पेक्षा खूप सुंदर आत्मे माझ्या अगोदर आहेत. मी सुबुद्धीवानही नाही. मला तर याचीदेखील कल्पना नाही की मी त्याच्याशी संभाषण कसे करावे? तो मला पसंद करील की नाही कोणास ठाऊक?

जेव्हा मला परमात्मा कृपाल भेटले तेव्हा मी माझ्या प्रिय सतगुरूंना हेच म्हणालो, ''मला कल्पना नाही की मी तुमच्याशी काय बोलू? तुम्हाला काय संबोधु? माझे हृदय-बुद्धी रिक्त आहे.''

नाहिन दरबु न जोबन माती मोहि अनाथ की करहु समाई।।

अभिमान करण्याजोगे ना माझे ध्यान–नामस्मरण आहे ना माझे यौवन आहे. तेथे गेल्यावर माझी काय सुनावणी होईल? तुम्हांस कल्पना आहे की जे प्रेमी ध्यान–नामस्मरण करून येत नाहीत, ते माझ्याकडे आल्यावर हेच म्हणतात,''आम्हांस तुमच्याजवळ येण्यास खूप लज्जा वाटते.'' जे प्रेमी ध्यान–अभ्यास करून येतात, ते मला त्यांचे चांगले आंतरिक अनुभव सांगतात. मलाही आनंद होतो व त्यांनादेखील माझे उत्तर ऐकून हर्ष होतो.

खरेतर आपण विचार केला पाहिजे की परमात्म्याचे प्रिय संत आपल्या अंतर्यात आपली वाट पाहत बसलेले आहेत, आपण त्यांस काय भेट देऊ?

अज की ले जाऊंगा मैं भेंटा यार दी, ते खाली हाथ जांदे नूं शर्म मार दी।
अज न जे गया ते बात है गजब दी, एक दिन मंगदा मगोंदा गया घरे यार दे।
अलख जगाई जिवें हौका मार दे, खैर आके पाओ पाओ वे मरादियां।
ठीकरे च खैर कृपाल आण पाया है, हो गया बेहोश ते नैन भर आया है।
अजाबय जाण लीता मेरा यारां दीआ।।

शरीराची नऊ द्वारे मोकळी करून अंतरामध्ये जाऊन जर परमात्म्याशी भेट घेतली नाही तर ते एक अत्यंत गजब आहे. मी अनेक दरवाजे ठोठावले परंतु माझा प्रयत्न सोडला नाही. एके दिवशी मागत मागत मी माझ्या प्रिय जीवलगाच्या द्वारी पोहचलो व भीक मागण्यासाठी हाक मारली की माझ्या झोळीत भीक घाल तुझी मनिषा पूर्ण होईल. तुझ्या अपेक्षेनुसार तुला शिष्य मिळेल. युगा–युगांतरापासून दुरावलेला मित्र माझ्या जवळ आला आहे.

सेवक जेव्हा स्वत:स अनाथ समजू लागतो तेव्हा सतगुरू त्याचे रक्षणकर्ते बनतात. याचा अर्थ असा नाही की आपण मुले–मुली, समाज वा घरा–दाराचा त्याग करावा. यांच्यामधून आपण आपले हृदय दूर करावयाचे आहे. सतगुरू गरीब–नवाज असतात. जेव्हा आपण स्वत:स अनाथ समजू लागतो तेव्हा त्यांना आपली दया वाटते. ते नक्कीच आपली सहाय्यता करतात.

खोजत खोजत भई बैरागनि प्रभ दरसन कउ हउ फिरत तिसाई।।

परमात्म्यास मठांमध्ये शोधले, जप–तप केले, जलधारे केले, धुनी पेटवून तप केला तसेच अनेक प्रकारची कर्मकांडे केली परंतु त्याने तृप्ती तर मिळालीच नाही, किंबहुना तृष्णा, तळमळ आणखीन वाढली.

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगत आहेत, ''आम्ही जेव्हा परमात्म्याचा शोध घेतला, संत महात्म्यांच्या चरणी शरण गेलो, तेव्हा हृदयात आणखीन तळमळ निर्माण झाली की हे संत–महात्मे ज्या परमात्म्याबद्दल इतक्या मधुर गोष्टी सांगत आहेत, त्या परमात्म्यास भेटूनच आपणांस शांती प्राप्त होईल. तेव्हा त्यास आपण का बरे भेटू नये?''

दीन दइआल कृपाल प्रभ नानक साध संगि मेरी जलनि बुझाई।।

महाराज कृपाल सांगत असत, ''जेथे इच्छा, तेथे मार्ग, ज्यास आपण हाक मारतो, तो आपणांस जरूर भेटतो.'' आपण सांगत आहात की कृपा करणारा साधू भेटला आहे. त्या साधूच्या संगतीत बसलो असता माझी तृष्णा भागली आहे. माझ्या अंतरामध्ये जी परमात्मा प्राप्तीची तळमळ होती तो परमात्मा मला मिळाला आहे.

प्रभ मिलबे कउ प्रीति मन लागी।।
पाइ लगउ मोहि करउ बेनती कोऊ संतु मिलै बड़भागी।

जेव्हा आत्म्याची तहान भागते, अंतर्यात शब्द–रूपी गुरू प्रगट होतात, तेव्हा आत्मा त्यांचे आभार मानतो. मी दररोजच आपणांस सांगत असतो की सतगुरूंद्वारे तुमचा काही फायदा झाला असल्यास तुमचे हृदय त्यांच्या प्रेमाने गद्–गद् व्हावयास हवे. श्वासा–श्वासाला मुखाद्वारे त्यांचे आभार मानावयास हवे. मी त्यांच्या चरणी लोटांगण घालतो की मोठ्या भाग्याने मला संत भेटले ज्यांनी मला स्वगृही पोहचविले. त्यांनी ना माझ्यावर केलेल्या उपकाराची जाणीव करून दिली, ना माझ्या घरा–दाराचा त्याग करावयास लावला ना माझ्याकडून काही मोबदला मागितला.

मनु अरपउ धनु राखउ आगै मन की मति मोहि सगल तिआगी।।

गुरू अर्जुनदेवजींनी जागो-जागी संतांचा महिमा लिहिला आहे:

हम सन्तन की रैण प्यारे हम सन्तन की शरणा।
सन्त हमारी ओट सताणी सन्त हमारा गहना।
सन्तन स्यों मेरी लेवा देवी सन्तन स्यों व्यवहारा।
सन्तन मोको पूंजी सौंपी ते उतर या मन को धोखा।
धर्मराय अब कहाँ करेगो जो फाटयो सगलो लेखा।
महा आनन्द पया सुख पाया सन्तन के प्रसादे।
कहो नानक हर स्यों मन माया रंग रते बिसमाधे।।

जो प्रभ की हरि कथा सुनावै अनदिनु फिरउ तिसु पिछै विरागी।।

ज्यांना सत्संगाच्या महिमेची माहिती असते तेच सत्संगाची कदर करतात. त्याचप्रमाणे जे सतसंग ऐकविणाऱ्या गुरूंचा महिमा जाणतात त्यांनाच गुरूंची कदर असते. म्हणून माझ्या सतगुरूंच्या मागे-मागे मी वैरागी बनून फिरतो कारण ते त्यांच्या देशातून येऊन मला प्रभुच्या मधुर-मधुर गोष्टी सांगतात. कबीर साहेब देखील सांगतात:

सन्त की गैल न छोड़िए, मार्ग लगया जाए।
पेखत ही पुनित होय, भेटत जपिए नाओ।।

पूरब करम अंकुर जब प्रगटे भेटिओ पुरखु रसिक बैरागी।।

गुरू अर्जुनदेवजी महाराज प्रश्न विचारीत आहेत की,''आपण स्वत:हून अशा महात्म्यांच्या कथा ऐकू शकतो वा त्यांच्या संगतीमध्ये जाऊन बसू शकतो काय?'' मग स्वत:च सांगतात, ''नाही! जेव्हा आपली खूप चांगली कर्मे जमा होतात, तेव्हा परमात्मा आपणांस त्यासाठी काही बक्षिस देऊ इच्छितो. त्याच वेळी आपण अशा महात्म्यांचा सत्संग ऐकू शकतो; दोन घडी तेथे बसू शकतो, आपल्या भरकटलेल्या मनास समजावू शकतो.''

मिटिओ अंधेरू मिलत हरि नानक जनम जनम की सोई जागी।।

***

सतगुरूंचे स्वप्न

परमसंत अजायब सिंहजी महाराज द्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे,
जयपुर, राजस्थान – ६ मार्च १९९२

एक प्रेमी : काय आपण आम्हांस समजावून सांगाल की आपण स्वप्नाद्वारे वा ध्यान–अभ्यासात जे काही आम्हांस देता त्या गोष्टींबद्दल आम्ही इतरांशी चर्चा केल्यास आम्ही ते पूर्णपणे गमावून बसतो की त्यापैकी काहीसा भाग गमावतो? आम्ही जर ध्यान–अभ्यासामध्ये आलेल्या अनुभवांबद्दल इतरांशी चर्चा केली तर तसा अनुभव आम्हांस पुन्हा होऊ शकतो? वा तो अनुभव कायम स्वरूपी आम्ही गमावून बसतो? याचा आमच्या ध्यान–अभ्यासावर काय परिणाम होतो?

बाबाजी : बंधुंनो! खूप चांगला प्रश्न विचारला गेला आहे. परंतु अशा प्रकारच्या अनेक प्रश्नांची उत्तरे संतबाणी मासिकात छापली गेली आहेत व सत्संगांमध्येदेखील याविषयी सांगितले गेले आहे की मन आपणांस कशाप्रकारे सतावत असते. तुम्ही जर मासिक वाचण्याची सवय करून घेतली तर अशा प्रश्नांची उत्तरे एक नाहीतर दुसऱ्या मासिकात सहज मिळू शकतात.

सर्वसाधारणपणे आपण दिवसभर जी काही कामे करतो व विचार करतो त्यातूनच स्वप्ने निर्माण होतात. आपण जागृत अवस्थेमध्ये असताना आपला आत्मा तीसऱ्या तिळावर एकाग्र असतो. तेव्हा आपण पूर्णपणे सावध अवस्थेत असतो. परंतु आपण निद्रावस्थेत असताना आत्मा आपल्या कंठामध्ये येतो त्यामुळे आपणांस काही गोष्टी लक्षात राहतात तर काही आपण विसरून जातो. आपण जेव्हा गहन निद्रावस्थेत असतो, तेव्हा आपला आत्मा नाभीमध्ये उतरतो. त्यावेळी आपली चेतनशक्ती पूर्णपणे जागृत अवस्थेत नसते. मग अशा अवस्थेत आपण जे काही करतो वा जो काही विचार करतो तो अर्धवट असतो जसे एक हातच नाही किंवा एक पायच नाही.

अनेकदा आपण स्वप्नामध्ये धावण्याचा प्रयत्न करतो परंतु आपणांस धावता येत नाही. अनेकदा स्वप्नामध्ये भयदेखील वाटते. म्हणूनच सत्संगामध्ये सांगितले जाते की नामापासून दूरावल्यास आपणांस ना जागृत अवस्थेमध्ये शांती असते ना निद्रावस्थेमध्ये. झोपेतदेखील आपण मारा–मारा, पकडा–पकडा करत असतो, आपणांस चैन पडत नाही. बहुतकरून अशी स्वप्ने भयानक व भीतीदायकही असतात.

या प्रश्नाचे उत्तर मी तुम्हाला दोन भागात सोपे करून सांगतो. त्यांपैकी सांसारिक स्वप्नांविषयीचा पहिला भाग मी आपणांस सांगितला आहे. प्रश्नाचा दुसरा भाग तुम्ही **सतगुरूंच्या स्वप्ना** विषयी विचारला होता की स्वप्नामध्ये सतगुरू दृष्टिस पडले किंवा अंतर्यात चांगला अनुभव आला, तर तो अनुभव आपण इतरांना सांगावा की सांगू नये?

नेहमी सांगितले जाते की सतगुरू पवित्र भांडे असते जे नामरूप झालेले असते. आपल्या शरीरामध्ये नेत्रांच्या खालील भागांमध्ये इंद्रियांचे भोग आणि विषय–विकार आहेत. त्यामुळे पवित्र सतगुरू कधीही आपणांस नेत्रांच्या खालील भागामध्ये येऊन दर्शन देत नाहीत, ना आपणांस तेथे ते सापडतील. परंतु सांगताना खेद वाटतो की आपण सत्संगी विशेष ध्यान–अभ्यास करीत नाहीत. जे लोक ध्यान–अभ्यास करतात, त्यांना या गोष्टीचे चांगले आकलन झालेले असते की ज्यावेळी आपण ध्यान–अभ्यास करून झोपी जातो, त्यावेळी आपला आत्मा शांत असतो. अशावेळी सतगुरू आपल्या प्रेमळ नजरेने प्रेमाच्या काट्याने आत्म्यास या नऊ द्वारांमधून वरती खेचून वरील मंडळांमध्ये घेऊन जातात. आपणांस जेव्हा कधी सतगुरूंचे दर्शन होते ते वरील मंडळांमध्येच होते. अनेक प्रेमींचा ते ध्यान–नामस्मरण करीत असताना न उघडणारा आंतरिक आडपडदा अशावेळी उघडतो.

मन आपला कट्टर शत्रू असून तो काळाचा प्रतिनिधी आहे. त्यास हेच काम नेमून दिलेले आहे की कोणत्याही आत्म्यास सतगुरूंद्वारे नामाची प्राप्ती

होऊ नये. आत्म्याने जर नाम प्राप्त करून घेतले, तर त्याने ध्यान–अभ्यास करू नये. जर त्याने ध्यान–अभ्यास केला, तर त्या आत्म्यास भ्रमामध्ये गुंतवून टाकणे. मग यासाठी मन कोणतीही संधी वाया दवडीत नाही.

मी जेव्हा पहिल्या दौऱ्यावर ननैमो द्वीपावर गेलो तेव्हा तेथे नामदानाचा कार्यक्रम झाला. प्रेमींना खूप चांगले आंतरिक अनुभव झाले. त्यांनी आनंदाने ते अनुभव मला सांगितले. त्याचवेळी असा देखील प्रश्न विचारला गेला की, ''बाबाजी! आम्ही येथे जे काही पाहिले, ते घरी गेल्यावर देखील पाहू शकू का?'' मी हसून म्हणालो,''होय प्रिय बंधुंनो! ही आंतरिक प्रगती कमी होणार नाही, परंतु यांमध्ये पुढे वाढ करणे हे तुमचे परमकर्तव्य आहे.''स्वत:च्या नेत्रांनी पाहूनदेखील आपले मन आपणांस भ्रमामध्ये टाकू शकते तर मग स्वप्नामध्ये सतगुरूंनी आपल्यावर दया करून आपल्या आत्म्यास वर खेचलेले असते, त्यावर संभ्रम निर्माण करणे मनासाठी अतिशय सोपे काम असते.

एका स्त्रीने महाराज सावन सिंहजींना प्रश्न विचारला,''मला जे काही अध्यात्मिक अनुभव येत होते, ते येण्याचे आता थांबले आहे. मी इतरांना त्या अनुभवांबद्दल सांगितले होते.'' महाराजजी म्हणाले, ''यामध्ये गुरूंची काय चूकी आहे? तुम्हाला जर एखादा मौल्यवान हिरा मिळालेला असेल, तर तुम्ही लोकांना त्याबद्दल सांगाल काय? तसे केल्यास लोक तुमचा हिरा चोरून नेतील.'' याचप्रमाणे तुम्ही तुमचे अध्यात्मिक अनुभव इतरांना सांगता, तेव्हा त्या लोकांना तुमच्याबद्दल मत्सर निर्माण होतो की याने किती आंतरिक प्रगती केली आहे! मग त्याच्या दुष्कर्मांचा प्रभाव आपल्यावर पडतो व आपल्या आत्म्याचा आरसा धूसर होतो.

अबोहर येथे महाराज कृपालजींचा एक प्रेमी नोकरी करीत असे. तो खूप ध्यान–अभ्यास करीत असे, तसेच त्याचा महाराज कृपालजींवर खूप विश्वास होता. त्याच्या बाबतीतही असेच घडले. त्याने त्यास येणाऱ्या अनुभवांबद्दल इतरांना सांगितले. त्यानंतर त्यास अंतर्यातील प्रकाश दिसणे बंद झाले.

जेव्हा त्यास महाराजजी माझ्या आश्रमात आलेल्याचे कळले तेव्हा तो आला व रडू लागला. तो म्हणाला,''मी सर्वकाही गमावले आहे, माझ्याकडून खूप मोठी चूक झालेली आहे.'' महाराज कृपाल म्हणाले,''तू एखाद्या कुरूप व हपशी व्यक्तीस आरसा दाखविल्यास तो आरसा फोडून टाकेल नाही तर काय करेल? आता सांग यात तुझी चूक आहे का आरसा फोडणाऱ्याची?

याचप्रमाणे दोन वर्षांपूर्वीची घटना आहे. पंजाब प्रांतातील एक प्रेमी १६ पी.एस. आश्रमामधून नामदान प्राप्त करून परत त्याच्या गावी गेला. त्यास आलेले उत्तमोत्तम अनुभव त्याने गावी गेल्यावर इतर सत्संगींना सांगण्यास सुरूवात केली. ते ऐकून एका सत्संगीला खूप मत्सर वाटला. त्याने मला पत्र लिहिले, मला खूप वाईट वाटते की मला नामदान मिळून ११-१२ वर्षे झाली आहेत. त्याच गांवच्या दुसऱ्या एका प्रेमीचे सुद्धा पत्र मला आले की मला नाम घेऊन वीस वर्षे झाली आहेत परंतु अजूनही मी इतकी प्रगती करू शकलो नाही आणि या प्रेमीस कालच नाम मिळाले असूनही हा इतकी प्रगती कशी बरे करू शकतो? माझ्या हृदयात खूप मत्सर व द्वेष उफळून येत आहे.

मी त्या प्रेमींना अतिशय प्रेमाने उत्तर लिहिले की थोडा वेळ थांबा, हा अशाप्रकारच्या उच्च अनुभवाच्या गोष्टी करणार नाही. माझे पत्र पोहचेपर्यंत त्यास अनुभव येणे थांबेल. त्यानंतर तो प्रेमी दर महिन्यास सत्संगासाठी जरूर येतो, परंतु त्यास येणारे अनुभव थांबल्याने तो तळमळतो, पश्चातापाने रडतो. मी त्यास म्हटले,''हे बघ प्रिय शिष्या! तो तर सतगुरूंनी तुझ्यावर केलेला कृपावर्षाव होता. आता तू स्वत: मेहनत कर, हिम्मतीने कष्ट कर. ते सर्वकाही तुझ्या अंतर्यातच आहे.'' त्यामुळे तुमच्या आंतरिक अनुभवाबद्दल इतरांना सांगितल्यास त्यांना ईर्षा होते की हा किती प्रगती करीत आहे! व त्याचा त्यांस काही फायदा होत नाही परंतु तुमचे नुकसान नक्कीच होईल.

महाराज कृपाल, महाराज सावन तसेच मी देखील नेहमी हाच सल्ला देतो की तुम्ही कुणा भोळ्या सत्संगीस त्याच्या आंतरिक अनुभवांबद्दल विचारू

नका आणि तुमच्यावर जर परमात्म्याने कृपा–वर्षाव केला असेल तर त्यास कवड्यांप्रमाणे उधळूही नका. महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''तुम्ही जर काही अंतर्यात पाहत असाल तर तुमच्यामधून धूरदेखील बाहेर पडता कामा नये की आम्ही उच्च आहोत. ही सर्व सतगुरूंची कृपा आहे.''

प्रियजनहो! आपण कसलाही विचार केला नाही तरी आपणांस सांसारिक स्वप्ने पडतात. परंतु सतगुरूंचे स्वप्न असे सहजासहजी पडत नाही. खरेतर सतगुरूंचे स्वप्न पडावे म्हणून खूप प्रेमी प्रयत्न करतात. सतगुरूंची आठवण काढीत झोपी जातात. अनेक प्रेमींची पत्रेदेखील येतात ज्यांमध्ये ते लिहितात की आम्ही गुडघे टेकून प्रार्थना करतो की आम्हांस स्वप्नात सतगुरूंचे दर्शन व्हावे. ही अतिशय शांत चित्ताने विचार करण्याजोगी गोष्ट आहे की सतगुरू कधीही नऊ द्वारांच्याखाली येऊन आपणांस दर्शन देणार नाहीत. सतगुरू जेव्हा कधी त्यांच्या प्रेमळ दृष्टीने तुमच्या आत्म्यास नऊ द्वारांच्या वरती ओढून घेतील, तेव्हाच तुम्ही वरील मंडळांमधील दृश्ये पाहू शकाल.



खरेतर सत्संगीने त्या वेळेचा पुरेपुर फायदा करून घ्यावयास हवा. दररोज सतगुरूंचे ते पाहीलेले स्वरूप आपल्या नजरेसमोर ठेवून ध्यान–अभ्यास करावयास हवा, त्यापासून लाभ घेऊन पुढे उन्नती करावयास हवी. संतमत पऱ्यांच्या दंतकथा नसून ते एक वास्तव व सत्यावर आधारीत असून प्रत्यक्ष करण्याचा मार्ग आहे; तो बौद्धिक विचारांचा मार्ग नाही. यांमध्ये लहान मुल, वयस्कर मनुष्य, स्त्री–पुरुष कोणीही भक्ती करू शकतो. कबीर साहेब सांगतात की,''कथन करण्यात प्राविण्य असणारे अनेक कथेकरी आढळतात ज्यांनी एकमेकांना तुच्छ लेखण्यासाठी मन बुद्धीच्या विचारांचे अनेक बाण कसलेले असतात, परंतु खरा मतिथार्थ सांगणारे खूप कमी असतात कारण नाम–अभ्यासाची कमाई करून ते सत्यास जोडले गेलेले असतात.'' अशा लोकांना महाराज कृपाल बुद्धीमत्तेच्या स्थरावर कुस्ती करणारे दिमागी पहिलवान असे संबोधत असत. प्रियजनहों! हा मार्ग गप्पा–गोष्टींचा (कथनीचा) नसून स्वत: करणी करण्याचा मार्ग आहे. तुम्ही नवीन भजनामध्ये वाचता:

ऐह गल्लां दा मजबून नहीं कोई वी करके देखे।

मला वाटते की आपणांस हा मुद्दा सरळ व सोप्या रितीने समजला असावा. सांसारिक स्वप्नं पडल्याने आनंद होत नाही. जेव्हा कधी आपणांस स्वप्नामध्ये सतगुरूंचे दर्शन होते तेव्हा आपणांस आनंद होतो, संपूर्ण दिवसभर आपले हृदय गुलाबाच्या फुलाप्रमाणे प्रफुल्लीत राहते. आपण त्यास स्वप्न न समझता खरोखरीच झालेले दर्शन समजावे व त्या स्वरूपास नजरेसमोर ठेवून ध्यान–अभ्यास करीत अंतर्यात प्रगती करावी.

***

अनमोल वचन

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे सत्संगाच्या कार्यक्रमा अखेरीस संगतसाठी दिलेला एक महत्वपूर्ण संदेश, राजस्थान आश्रम – ७ डिसेंबर, १९८९

बंधूंनो, ही खूप उत्तम वेळ आहे जी आपणांस दयाळू सतगुरू सावन कृपालजींनी दिलेली आहे. यापेक्षा आपले उच्च भाग्य अजुन काय असू शकते की आपणांस प्रिय सावन–कृपालजींच्या कृपेने आज या अंशात कलियुगामध्ये सत्संगात बसण्याची, नामासोबत समरस होण्याची तसेच त्यांच्या स्मरणात तल्लीन होण्याची संधी लाभली.

भले सतयुग असो, द्वापार युग असो, त्रेतायुग असो वा कलियुग असो; कोणत्याही युगात नाम जपणे अवघडच असते. कलियुगात भलेही सत्संगींची संख्या अधिक असली, तरीही सर्वांचे लक्ष अधिकाधिक संसारात विखुरलेले आहे. कोणासही विचारा की तू नाम जपतोस का? त्याची हीच तक्रार असते की मोकळा वेळ मिळत नाही, फुरसत नाही. गुरू नानकदेवजी सांगतात:

सारा दिन मजदूरी करे, हर सिमरन वेले वज्र सिर पड़े।

आपण काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार या पाच डाकूंची तसेच मन व मायेची हमाली करतो. ते जो काही आपणांस आदेश देतात, त्याची आपण ताबडतोब पालना करतो; त्यांच्या समोर आपण नतमस्तक होतो. सतगुरू आपणांस सांगतात की तुम्ही नाम जपा; नामाचा जप तुमच्यासाठी फायदेशीर आहे. नाम जपणारा नेहमी शांतचित्त असतो, नामामध्येच शांती आहे. नाम त्या शक्तीस म्हटले गेले आहे जी कणा–कणाणमध्ये व्यापलेली आहे व जी शक्ती वेळोवेळी आपले रक्षण करीत आहे. तिच्या आधारानेच आपण हालचाल करीत आहोत. नामाचा जप न करणे हे आपल्यासाठी किती नुकसानीचे आहे? खरेतर ही आपली घोडचूक आहे. ती शक्ती आपल्या अंतरामध्ये असल्यामुळेच लोक आपल्यावर प्रेम करतात, मुले,

पती, पत्नी आणि नातेवाईक सर्वजण आपला आदर करतात. कबीर साहेब सांगतात की जेव्हा ती शक्ती आपल्या अंतरामधून निघून जाते, तेव्हा:

घर की नार बहुत हित जास्यों, सदा रहत संग लागी।
जब ही हंस तजी यह काया, भूत भूत कर भागी।।

पती–पत्नीचे नाते सर्वात घनिष्ठ नाते असते परंतु जेव्हा असा मृत्यूसमय येतो तेव्हा कोण मदतीस येतो? माझ्या समोर घडलेली एक घटना आहे. एक मनुष्य त्याच्या मुलांवर खूप प्रेम करीत होता. तो म्हणत असे की मुलांशिवाय मी जिवीत राहू शकत नाही. त्याचा मृत्यू झाला. प्रत्येकासच मृत्यू येणार आहे, आपणांसही मृत्यू येणार आहे. त्याच्या पत्नीने मुलांना सकाळी त्याचे मुख पाहू दिले नाही. तेथे अनेकजण उभे होते. ते तिला म्हणाले की मुलांना अंतसमयी वडिलांचे मुख पाहू दे. नकार देत ती म्हणाली मुले घाबरतील. आता हे आप–आपले विचार आहेत. तेथील उपस्थित लोकांच्या अंत:करणास धक्का बसला की या मुनष्याने त्याच्या मुलांसाठी परमेश्वराचाही त्याग केला, आपल्या मौल्यवान सिद्धांताचा त्याग केला; तऱ्हेतऱ्हेने चोरी–बेईमानी करून मुलांना खाऊ घातले. या मनुष्याने आपल्या पत्नीसाठी काय–काय म्हणून केले नाही? पत्नीसाठी स्वत:चे श्रेष्ठात श्रेष्ठ असलेले सिद्धांतदेखील बाजूस सारले, परंतु मुले घाबरतील म्हणून तीच पत्नी मुलांना त्याचे मुखही पाहू देत नाही.

आयुष्यात अशा घटना अनेकदा पाहवयास मिळतात. ही सांगण्यासारखी घटना नाही परंतु काय आपण स्वत:साठी नुकसानीचा व्यवहार करीत नाही आहोत का, की ज्या परमात्म्यामुळे आपला एवढा आदरमान केला जातो, त्याच्यासाठी आपले अंत:करण कधी तळमळले का? त्यास भेटावेसे कधी आपणांस वाटले का? काय कधी असा विचार केला की ज्या परमात्म्याने एवढे चांगले जीवन आपणांस दिले आहे, जो आपले मोफत संरक्षण करीत आहे, तो आपल्याकडून काही मागतो का?

महाराजा रणजित सिंहाकडे जाऊन एक भिकारी म्हणाला, ''महाराज! तुम्ही मला काहीतरी द्यावे.'' महाराजा रणजीत म्हणाला, ''मी तुला काय देऊ? परमेश्वराने तुला दोन नेत्र दिले आहेत मला तर एकच नेत्र दिले आहे. मी तुला पाचशे रुपये देतो, तू मला तुझे एक नेत्र द्यावेस.'' तो भिकारी घाबरला. राजाने माझे नेत्र काढून घेऊ नयेत, म्हणून तेथून पळू लागला. तेव्हा महाराजा रणजित सिंह म्हणाला,''तू घाबरू नकोस. तुला मी एक हजार रुपये देतो.'' अशा रीतीने बोली वाढत राहिली. राजा म्हणाला, ''मी तुझ्या नावावर एक गाव करून देतो. पण तू मला नेत्र दे.''

खरेतर तो एक भिकारी होता. एक नेत्र राजास देऊन त्या बदल्यामध्ये राजाकडून गाव घेऊन उरलेल्या एका नेत्राच्या मदतीने तो जीवन जगू शकला असता. तरीही त्याने राजास नेत्र दिले नाही, कारण देण्यासाठी कोण राजी असतो? महाराजा रणजित सिंह त्या भिकाऱ्यास म्हणाला,''भल्या माणसा, तू हेच हात परमात्म्या पुढे पसरले पाहिजे होतेस. परमात्म्याने तुला दोन नेत्र दिले आहेत परंतु मला तर एकच नेत्र दिले आहे. तरीदेखील मी परमात्म्याची भक्ती करतो, त्याचे आभार मानतो. तू देखील परमात्म्याचे आभार मानावयास हवे, त्याची भक्ती करावयास हवी.''

आपण कधी परमात्म्याचे आभार मानले काय? आपण कधी ध्यान-अभ्यास केला? त्याचे कधी स्मरण केले? ही परमात्म्याची कृपा आहे की त्यास आपली दया आली. आपला सुखशांतीचा देश त्यागून या निच स्थराच्या देशात तो आपल्यासाठी आला, ज्या रोगी देशास महात्मा कवडीमोलात देखील विकत घेण्यास तयार नसतात. गुरू नानकदेवजी सांगतात:

संसार रोगी नाम दारू मैल लग्गे सच बिना।

गुरू नानकदेवजींचे आई-वडील आयुष्यभर नानकजींना मारहाण करीत राहिले त्यांस घालून पाडून बोलत राहिले. तरीदेखील गुरू नानकदेवजींच्या अंत:करणामध्ये त्यांच्या प्रती दया आली की माझ्या आयुष्याचा काही काळ

मी यांच्या सोबत व्यतीत केला आहे. भले त्यांनी दुर्व्यवहार केला असला तरी महात्मा कृपाळू असतात. अखेरीस त्यांनी त्यांच्या आईच्या मुखातून वदवून घेतले, ''हे बघ नानक! आयुष्यभर आम्ही तुला आमचा मुलगाच समजत राहिलो. जे लोक तुला आदराने नमस्कार करीत होते त्यांना वेडे समजत राहिलो. आमच्या आज लक्षात आले की तू परमेश्वर आहेस. एका मनुष्याच्या रूपाने परमेश्वर या जगामध्ये आला आहे. तू आमच्यावर कृपा करून, आम्हालादेखील नामरूपी ज्योत दे.''

म्हणूनच तुम्हां सर्वांनी नाम जपावे जी शिकवण तुम्हाला दिलेली आहे. सत्संगीने नेहमी आपले मन एकाग्र करावयास हवे. आपण नामस्मरणाच्या मदतीने शरीराची नऊ द्वारे मोकळी करून आपल्या मनास एकाग्र करू शकतो. ट्रेनने, बसने प्रवास करीत असताना, कोणाशी बोलतानाही आपण आपले नामस्मरण करीत राहिले पाहिजे. आपण नामस्मरण तर करीतच नाही, उगाचच हाय! हाय! करतो की ध्यान–अभ्यास होत नाही मग नामस्मरण कसे बनेल. सत्संगीचे लक्ष तेलाच्या धारेसमान अतुट असावे. जशी तेलाची धार अखंड असते, तसेच सत्संगीचे नामस्मरणदेखील अखंडीत असावे.

आपला तीसरा तिळ हे आपल्या अध्यात्मिक प्रवासाच्या सुरूवातीचे स्थान आहे. त्यावर तुम्ही एकाग्र व्हावे. प्रकाश, सूर्य, चंद्र, तारे आणि गुरू–स्वरूप हे सर्वकाही आपल्या अंतर्यातच आहेत. जेव्हा आपले लक्ष एकाग्र होईल तेव्हा ते आपोआपच दिसतील. अशा सेवकाच्या अंतर्यात गुरू कधी–कधी स्वत:देखील प्रगट होऊन आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देतात. परंतु जेव्हा आपण आपली एकाग्रता भंग करतो तेव्हा हे सर्व तेथेच उपस्थित असूनही दिसेनाश्या होतात. मग आपण अनेकदा प्रश्न विचारतो की मी एवढे सर्व आपल्या अंतर्यात पाहिले होते, माहित नाही ते सत्य होते की असत्य? इतके सर्व पाहूनही आपल्या मनास विश्वास पटत नाही. परंतु आपण कधी मनास असे म्हणत नाही की तू अशा विचारांनी माझी एकाग्रता भंग केलीस.

सत्संगीने सातत्याने नामस्मरण करीत राहिले पाहिजे. सत्संगीचे अखंडित नामस्मरण चालूच असावे व ध्यान एकाग्र असावे. निद्रेमध्ये देखील सतगुरू सोबत असावेत व चालताना समोर चालत असलेले दृष्टिस पडावेत. ध्यान एकाग्रतेने हे साध्य होते. तुम्ही सर्वांनी अंत:करणापासून नामस्मरण करा.

मी तुम्हां सर्वांना परतीच्या प्रवासासाठी शुभेच्छा देतो. मी नेहमीच तुम्हाला प्रेमाने सांगतो की प्रवासामध्ये जास्त गप्पा–गोष्टी करू नका. माझी आपणांस खास विनंती आहे, जी अनेकदा यापूर्वी तुम्हांस केली गेलेली आहे की ज्या कोणांस पत्राचे उत्तर हवे असेल, त्याने पत्र पोस्टाने पाठवावे. कोणी दुसऱ्या व्यक्तीचे पत्र वा सेवा देत असेल तर ती देखील घेऊन येऊ नये. जो कोणी हे द्यावयास येईल, त्यास नम्रतेने नकार द्यावा.

तुम्ही जेव्हा वैयक्तिक भेटीसाठी येता, तेव्हा तुम्हास चांगला वेळ मिळतो. सुरूवातीला संगत कमी होती. परंतु जशी जशी संगत वाढत आहे, तेव्हा तुमचेदेखील कर्तव्य आहे की इतरांच्याही वेळेचा आदर ठेवावा. जर महत्वाची गोष्ट असेल, तर तुम्ही माझ्याजवळ तासभर बसा. मी तुमचे सांगणे ऐकेन, त्याचे उत्तरही देईन.

परदेशी लोक भेटीसाठी येतात. प्रत्येकाचे सांगणे प्रेमाने ऐकणे माझे कर्तव्य आहे. महत्वाची गोष्ट असल्यास मी नक्कीच प्रेमाने ऐकेन, मग त्यासाठी कितीही वेळ लागो. ते महत्त्वाचे असेल तेच सांगतात. त्यांच्या ज्या प्रश्नांची उत्तरे सत्संगामध्ये सापडतात, ते प्रश्न पुन्हा लिहून आणीत नाहीत. ते येथून काही ना काही कमाऊन घेऊन जातात, अनुभव सांगून जातात जे ऐकून मलादेखील आनंद होतो. मी त्यांना सांगतो की तुम्ही तुमच्या देशात जाऊन ध्यान–अभ्यास करून हा अनुभव कायमस्वरूपी घ्यावा. मी असे म्हणत नाही की तुम्ही जसे माझ्याकडे आला होतात, तसेच परत जावे. माझ्याकडून तुम्ही काही ना काही घेऊनच जा. जर तुम्हांस येथे सेवा मिळाली तर ती करा अथवा ध्यान–अभ्यासासाठी बसा. व्यर्थ गप्पा मारू नका. मनुष्य स्वत:

जसा असतो तसाच गप्पा मारण्यासाठी समोरून त्यास दुसरा मनुष्य भेटतो. लंगर तयार करताना नामस्मरण करावे वा भजन बोलावे. तुम्ही सतगुरूंकडे आलेला आहात, तेव्हा त्यांनी सांगितलेल्या गोष्टींवरच अंमल करावा.

महाराज सावन सिंहजी नेहमी संगत समोर सांगत असत, ''संगतमध्ये सर्वप्रकारची माणसे आहेत. जे ध्यान-अभ्यास करतात, सत्संगासाठी येतात, त्यांची काहीच तक्रार नसते. वृद्ध महिलांना इतरांची निंदा इतकी प्रिय असते की त्यांना निंदा-नालस्ती करणारे कोणी भेटल्यास, त्या सच्चखण्डाच्या दरवाजातूनही पुन्हा माघारी येतील. सत्संगामध्ये तसेच लंगर तयार करताना स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त भजन म्हणतात. सेवा करताना डोक्यावर टोपली असेल तरीही त्या भजन म्हणतात. त्या ध्यान-अभ्यासही खूप करतात, भजनही खूप म्हणतात. हे सर्व गुण स्त्रियांमध्येही असतात.''

मी आशा करतो की मी जे काही सांगत आहे, त्याचे तुम्ही वाईट वाटून न घेता, ते प्रेमाने समजून घेण्याचा तुम्ही प्रयत्न कराल. जेव्हा कधी येथे याल, तेव्हा प्रेमाने काही कमाई करून घेऊन जा.

एकदा सिकंदरपूर येथे महाराज सावन सिंहजी बसले असताना तेथे एक मुलगी कुठून उभी राहिली व म्हणाली की, अमुक एक महिला माझा ध्यान-अभ्यास घेऊन गेली. महाराजजींनी विचारले,''ती तुझा ध्यान-अभ्यास कसा बरे घेऊन गेली?''ती मुलगी त्या स्त्रीची निंदा करू लागली. महाराजजी म्हणाले,''ज्याच्याकडे ध्यान-अभ्यासाची पुंजी आहे त्यास विचार करावा लागतो की मी अशा गोष्टी बोलू की नको. ध्यान-अभ्यास करणारी व्यक्ती कधीही अशा रितीने गोष्टी बोलणार नाही.''

तुम्ही सर्वांनी ध्यान-अभ्यास, नामस्मरण करावे. प्रवासामध्येदेखील आपले नामस्मरण करीत जावे. झोपून रात्र व्यतीत करू नका. असा विचार करू नये की मिळालेली सीट झोपण्यासाठी आहे. सत्संगीने त्याचा ध्यान-अभ्यास करीत लाभ करून घ्यावयास हवा.

***

हृदयातील तळमळ

सत्संग: परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू अर्जुनदेवजी महाराजांची वाणी, सेगल, आईडोहो – २ ऑगस्ट १९८०

मेरा मन लोचै गुर दरसन ताईं।। बिलप करे चात्रिक की न्याईं।।

सदर वाणी श्री गुरू अर्जुनदेवजी महाराजांची आहे. ही वाणी त्यावेळी रचली गेली जेव्हा गुरू रामदासजी अमृतसर येथे तर अर्जुनदेवजी महाराज लाहोर येथे होते. गुरू रामदासजींच्या नातेवाईक कुटुंबात एक विवाह होता. लग्न घरामधून गुरू रामदासजींना लग्नाचे आमंत्रण पाठविले होते, परंतु त्यांना जाणे शक्य नसल्याने त्यांनी अर्जुनदेवजींना लग्नासाठी पाठविले. सोबत असे देखील सांगितले की,''जोपर्यंत तुला माघारी बोलावले जात नाही, तोपर्यंत तू परत येऊ नयेस.''

तुम्हांस कल्पना आहे की गुरूआज्ञेचे पालन करणे किती जरूरी असते. नामाभ्यासाची कमाई करणारे याचे महत्त्व जाणतात. हुजूर सांगत असत, ''ज्यास माझ्यावर प्रेम करायचे आहे, त्याने सर्वप्रथम माझ्या आज्ञेचे पालन करावे.'' गुरू अर्जुनदेवजींच्या हृदयात सतगुरूंच्या दर्शनाची तळमळ होती, कारण ते दररोज बाह्य स्थूल स्वरूपामध्ये दर्शन करीत असत आणि दुसऱ्या बाजूला त्यांना सतगुरूंचा आदेशदेखील होता की जोपर्यंत मी तुला माघारी बोलावित नाही, तोपर्यंत तू येऊ नयेस.

गुरु अर्जुनदेवजींनी त्यावेळी लाहोर येथून ही पत्रं सतगुरू रामदासजींना लिहिली होती. या पत्रांद्वारे ते त्यांच्या सतगुरूंना सांगू इच्छितात की माझ्या अंतरामध्ये तुमच्या दर्शनाची एवढी तळमळ आहे की ज्याप्रमाणे पाण्याबाहेर काढलेला मासा पाण्यासाठी तडफडत असतो, ज्याप्रमाणे चातकपक्षी स्वाती नक्षत्रामधील पावसाच्या थेंबासाठी तळमळत असतो, कारण त्यास स्वाती नक्षत्रा खेरीज याजगातील पाणी आवडत नाही. हजरत बाहू सांगतात:

ऐह तन मेरा चश्मा होवे, मैं मुर्शिद वेख न रज्जा हू।
लूं लूं दे मुड़ लख लख चश्मे एक खोला एक कज्जा हू।
इतना डिट्ठया सब्र न आवे मैं होर किते वल भज्जा हू।
मुर्शिद दा दीदार है बाहू मैंनू लख करोड़ा हज्जा हू।।

या जगात असलेले कोणतेही नाते–संबंधी, मित्र–मंडळी आपल्या अंतिम–समयी आपली साथ देणार नाहीत. हे सर्व स्वत:च्या स्वार्थासाठी आपल्यावर प्रेम करतात. केवळ आप–आपल्या स्वार्थासाठीच हे सर्वजण एकत्रित झाले आहेत. केवळ सतगुरूच आपले खरे साथीदार आहेत. जेव्हा आपली कोणीही मदत करीत नाही, त्यावेळी येऊन सतगुरू आपणांस मदत करतात.

पल पल करिए याद गुरू नूं अंदर छुप छुपाते।
इक गुरू बिन दुनिया अंदर झुठे सारे नाते।।

ज्याप्रकारचे प्रेम गुरू अर्जुनदेवजी व्यक्त करीत आहेत की सतगुरूंच्या दर्शनासाठी माझ्या अंतर्यात तळमळ निर्माण झाली आहे, त्याप्रकारची सतगुरू दर्शनाची तळमळ जर एखाद्या सेवकाच्या अंतरात निर्माण झाली, तर त्या सेवकास दररोज ध्यान–नामस्मरण करण्याची वा बसून स्वत:चे गुडघे आखडून घेण्याची गरज नाही. कारण ही तळमळच आपल्या अंतर्यामधील आडपडदा दूर करते. महात्मा आपणांस सांगत आहेत की ज्यांच्या अंतरात तळमळ असते, तेच लोक ध्यान–अभ्यास करतात, सेवा करतात आणि सतगुरूंच्या आदेशाचे पालन करण्यासाठी स्वत:स झोकून देतात.

त्रिखा न उतरै सांत न आवै बिन दरसन संत प्यारे जीओ।
हौं घोली जीउ घोल घुमाई गुर दरसन संत प्यारे जीओ।।

आता आपण सांगता,''हे सतगुरू! मी तुमच्यासाठी माझे शिर अर्पण करतो, स्वत:स ओवाळून टाकतो, कारण तुमच्या दर्शनाशिवाय मला शांती आणि तृप्ती लाभत नाही. माझे शरीर अग्नीसमान तप्त झालेले आहे ते केवळ तुमच्या दर्शनानेच शांत होऊ शकेल.'' फरीद साहेब सांगतात:

गलिए चिक्कड़ दूर कर नाल प्यारे न्यों।
चला तां भीजे कंबली रहां ता टूटे न्यों।
भीजो सीजो कंबली अल्लाह बरसे मेहों।
जाए मिला तिन सजणा मेरा टूटे नाहीं न्यों।।

गुरूसाहेब सांगत आहेत,''माझ्या प्रिय गुरूंशी कोणी भेट करून देत असेल, तर मी त्यामोबदल्यात स्वत:स विकून टाकण्यासही तयार आहे.''

सँप्पा वाड़ समुद्र घर शेरा पए बेकुन्न।
जे जम होय पेहरू प्रेमी न रूक्कन।।

तेरा मुख सुहावा जीओ सहज धुन बाणी।। चिर होआ देखे सारिंगपाणी।।

आता आपण सांगत आहात, ''हे सतगुरू! तुमच्या सत्संगास येऊन बराच काळ लोटला आहे. कारण मी लाहोरमध्ये असून, सत्संग येथून तीस मैल दूर अंतरावर, अमृतसरमध्ये होत आहे. ज्याप्रमाणे चातक पक्षी स्वाती नक्षत्रामधील पाण्याचा थेंब मिळून बराच काळ लोटल्यामुळे तहानेला तळमळत आहे, त्याचप्रकारे तुमचे दर्शन होऊन खूप काळ लोटला आहे, तुमच्या दर्शनासाठी मी तळमळत आहे, मी तुमच्या सत्संगाअभावी तळमळत आहे, तुम्ही माझी हाक ऐका, माझ्यावर कृपा करा.''

काफ कद्र बिछोड़े दी ओह जाणे जेहणा बिछड़े अपने यार कोलों।
तंदरूस्त नू सार की दुखड़े दी दुख पुछिऐ किसी बिमार कोलों।।

सतगुरूंच्या महानतेची जगास काय कल्पना? गुरूंविषयीचे ज्ञान गुरूंच्या सेवकांनाच असते ज्यांच्या अंतर्यातील आडपडदा दूर झालेला असतो त्यांना ज्ञान असते की सतगुरू किती महान आहेत, ते कोणते दान देतात?

जिन्हां लग्गे प्रेम तमाचे घर दे कम्मों गईयां।
लेणा देणा सब छुटया खू विच पइँयां बहियां।।

धंन सो देस जहां तूं वसया मेरे सजण मीत मुरारे जीओ।
हौं घोली हौं घोल घुमाई गुर सजण मीत मुरारे जीओ।।

आता आपण दर्शनाची इतकी तळमळ व्यक्त करीत आहात,''ज्या गावात, ज्या प्रदेशात तुम्ही वास करीत आहात, ते धन्य आहेत. जे जीव तुमच्या दर्शनाचा लाभ घेत आहेत, ते जीव धन्य आहेत.''

सा धरत पई हरियावली जित्थे मेरा सतगुरू बैठा जाए।
से जन्त पए हरियावले जिनि मेरा सतगुरू देखया जाए।।

इक घड़ी न मिलते तों कलजुग होता।। हुण कद मिलीऐ प्रिअ तुध भगवंता।।

आता आपण हृदयातील कळ व्यक्त करता की, तुमचे दर्शन एक क्षण जरी झाले नाही, तर मला काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार घेरतात, काळाच्या सर्व शक्ती माझा पिच्छा करतात. यांपासून आमचे रक्षण करू शकणारे तुम्हीच आमचे दयावान दाता आहात. तुम्ही मला कधी दर्शन द्याल? मला कधी तुमच्याजवळ बोलावून घ्याल? कारण तुम्ही बोलावल्याशिवाय मी परत येऊ नये, असे तुम्हीच सांगितले आहे. माझ्या हृदयात तळमळ निर्माण झालेली आहे की माझ्या आत्म्यास कधी तृप्ती लाभेल?

मोहे रैण न विहावै नींद न आवै बिन देखे गुर दरबारे जीओ।।

गुरू अर्जुनदेवजी महाराज आता सांगत आहेत,''रात्री तुमचे दर्शन न मिळाल्याने मला झोप येत नाही.'' फरीद साहेब सांगतात:

रातां होईयां वड्डीयां।

आता रात्री मोठ्या झाल्या आहेत. मला झोपदेखील येत नाही. कारण मी सतगुरूंपासून दुरावलो आहे. हजरत बाहू देखील सांगतात:

राती रत्ती नींद न आवे देहां बहुत हरानी हू।

प्रेमींना रात्री झोप येत नाही. कारण त्यांचा विरहअग्नी अस्थीभंगासमान वेदनादायक असतो. दिवसा मी हैराण होऊन भटकतो की जेणेकरून मला माझ्या प्रिय गुरूंचे दर्शन व्हावे, मला त्यांनी जवळ बोलावून घ्यावे. ज्याच्या अंत:करणात प्रिय गुरूंना भेटण्याची तीव्र इच्छा असते, तो परमात्म्यास प्राप्त केलेल्या साधू-संतांची विनवणी करतो की कोणीतरी त्यास परमात्म्याबद्दल काहीतरी सांगावे; परमात्म्याचा एखादा निरोप तरी द्यावा!

मजनुचे लैलावर प्रेम होते. खरे तर ते सांसारिक प्रेम होते. एकदा मजनूं म्हणाला जर कोणी माझ्या नजरेने पाहिले, तरच त्यास लैलाचा चेहरा दिसू शकेल. जगास काय कल्पना की लैला कशी आहे? लैला एका राजाची मुलगी होती तर तिच्यासाठी मजनूं फकीर बनला होता.

लैलाने राज्यामधील सर्व दुकानदारांना आदेश दिला की मजनूंने काहीही त्यांच्याकडून मागितले तर त्यास ते मोफत देण्यात यावे. त्यामुळे अनेक नकली मजनु निर्माण झाले. सर्व शहराचे नुकसान होऊ लागले. राज्यातील सर्व दुकानदार राजाकडे येऊन विचारू लागले,''मजनूं एक व्यक्ती आहे की अनेक आहेत?'' राजाने लैलास विचाराले,''मजनूं एक व्यक्ती आहे की अनेक व्यक्ती आहेत? कारण सर्व शहराचे नुकसान होत आहे.'' लैला म्हणाली, ''मजनूं एकच असून मी त्याबद्दलचे निराकरण करून देते.''

लैलाने दुकानदारांच्या दुकानात एक प्याला व एक सुरी ठेवली. दुकानदारांस सांगितले,''जो कोणी मजनूं येईल, त्यास सांगितले जावे की लैलास तुझ्या काळजामधील रक्ताची गरज आहे.'' तेव्हा दररोज मोफत दूध पिण्याकरीता मजनूं बनलेले सर्वजण तेथून पळून गेले. कोणीतरी खऱ्या मजनूंच्या कानावर ही गोष्ट घातली की तुझ्या नावाने शहराची अशाप्रकारे लुटमार होत आहे. आता लैलाने सांगितले आहे की तिला रक्ताची गरज आहे, परंतु सर्व मजनूं पळून गेले आहेत. तेव्हा खऱ्या मजनूंने आपल्या काळजाचे रक्त पेल्यात भरून लैलाकडे पाठवून दिले. लैला आपल्या वडिलांना म्हणाली,''मजनूं एकच असून बाकीचे सर्वजण नकली होते.'' महात्मा आपणांस समजावतात:

ईक झूठा मजनूं बन बैठा शहर दवाले आके।
लैली ओहनूं नित भेज दी खंड दूध विच पाके।
ईक दिन लैली खून मंगया प्याला लाओ भराके।
चतुरदास ओह मुनकर होया नस गया शरमाके।।

हे प्रेमी सांसारिक लोकांप्रमाणे शारीरिक संबंध ठेवत नसत. ते खरे प्रेमी होते. त्यांची अशी धारणा होती की जर आपण या जगातच संयम पाळू

शकलो नाही तर कसे चालेल? जो पुरुष मातीच्या स्त्रीशी एकनिष्ठ राहू शकत नाही, तो जेव्हा आंतरिक आडपडदा दूर सारून अंतर्यातील सूक्ष्म मंडळात जाईल, तेव्हा त्यास तेथे तेजस्वी व सुंदर स्त्रिया भेटतील, त्यावेळी तो तेथेच वास्तव्य करून राहील; तेथे तो कसाबरे एकनिष्ठ राहील?

महात्मा आपणांस येथे ब्रह्मचर्याचे पालन करण्याचा आदेश देतात की, आपल्या स्त्रीशिवाय इतरत्र जाऊ नये वा आपल्या पुरुषाशिवाय इतरत्र जाऊ नये, याचा हाच अर्थ आहे की आपण जेव्हा सूक्ष्म देशात जातो, तेव्हा तेथे काळ स्त्रीयांना देखणे पुरुष आणि पुरुषांना सुंदर स्त्रीया सादर करतो. जे येथेच एकनिष्ठ राहत नाहीत ते तेथे जाऊन कसे बरे एकनिष्ठ राहू शकतील?

महात्मा सर्वप्रथम आपण आपले जीवन पवित्र राखण्यावर आणि मन शांत ठेवण्यावर जोर देतात. पवित्र मनच भक्ती करू शकते. महात्मा आपणांस सांगतात की तुमच्या हृदयात असा विचार असेल की विषय-विकारांचा भोग घेत असतानाही आपणांस परमात्मा स्वत:मध्ये विलिन करून घेईल, तर तो विचार तुम्ही सोडूनच द्या. आपण जो विषय-विकारांचा भोग घेत असतो, ती परमात्म्याची आपण करीत असलेली थट्टा आहे.

मोहै रैण न विहावै नींद न आवै बिन देखे गुर दरबारे जीओ।।
हौं घोली जीउ घोल घुमाई तिस सच्चे गुर दरबारे जीओ।।
भाग होआ गुर संत मिलाया।। प्रभ अबिनासी घर मह् पाया।।

गुरू अर्जुनदेवजी महाराज आता परमात्म्याचा महिमा वर्णितात, त्याचे आभार मानतात की परमात्म्याने आपल्यावर कृपा केली व आपली संत-सतगुरूंशी भेट घडविली. जेव्हा त्या संत-सतगुरूंनी आपल्यावर कृपा केली, तेव्हा त्यांनी सांगितले की ज्या परमात्म्याचा तू शोध घेत आहेस, ज्याच्यासाठी तू चोवीस तास विव्हळत आहेस, तो परमात्मा तुझ्यापासून दूर नाही, तर तो तुझ्या शरीरात, देह-अस्तित्वातच आहे. कबीर साहेब सांगतात:

ज्यों तिल माही तेल है ज्यों चकमक में आग। तेरा प्रीतम तुझमें जाग सके तो जाग।।



ज्या ठिकाणी परमात्म्याचे वास्तव्य आहे, त्या ठिकाणी आपण त्यास शोधत नाही. आपण बहिर्मुखी होऊन कर्मकांडामध्ये फसतो. परमात्म्यास आपण दगड, पाणी आणि कागदांमध्ये शोधत राहतो.

युसुफच्या भावांनी पाहिले की युसुफ हुषार, नेक आणि सुज्ञ आहे. याच्याबरोबर आपण राहिलो तर आपणांस मान–मरतब न मिळता सर्व लोक यासच मोठेपण देऊ लागतील. भावांनी त्यास एका विहिरीमध्ये ढकलून दिले. तेथून मिश्र देशातील व्यापारी जात होते, त्यांनी पाहिले कोणा मनुष्याचे मुल विहिरीमध्ये पडलेले आहे. त्यांना त्या मुलाची दया आली. त्या व्यापाऱ्यांनी युसुफला विहिरीमधून बाहेर काढून त्यास मिश्रच्या राजास विकून टाकले. त्या राजाने युसुफला आपल्या राजवाड्यामध्ये चाकर म्हणून ठेवले. युसुफ खूप सुंदर आणि मेहनती होता. जुलेखां ही मिश्रच्या राजाची राणी होती. तिच्या मनात युसुफबद्दल कामवासनेचा विचार आला. एके दिवशी त्या राणीने युसुफला अनेक खोल्यांच्या आंतमध्ये बोलाविले व त्याच्या समोर मनातील कुविचार मांडला. युसुफने विचार केला की मी जर हीचे म्हणणे मान्य केले तर माझा धर्मभ्रष्ट होईल. परंतु हीचे म्हणणे मान्य केले नाही तर ती माझ्यावर खोटे आरोप घालून माझी हत्या घडवून आणेल.

युसुफ अद्याप विचाराच करीत होता की, जुलेखां तेथे असलेल्या एका दगडाच्या मूर्तीस कपड्याने झाकू लागली. जी मूर्ती तिला पूज्य होती. ते पाहून युसुफ म्हणाला, हे काय आहे? जुलेखां म्हणाली, हे माझे ईष्ट असून मला पुज्य आहे. आता आपण जे कुकर्म करणार आहोत, तो हे पाहिल. युसुफ म्हणाला की तू एका दगडास घाबरत आहेस की हा पाहिल परंतु माझा जो परमात्मा आहे त्याचे जागोजागी लक्ष आहे, तो माझ्या अंतरातही वसतो. एवढे म्हणून युसुफ पळू लागला तेव्हा जुलेखांने युसुफचा सदरा मागून पकडला व सदरा मागून फाटला. परंतु जुलेखां आपले कुकर्म करण्याची इच्छापूर्ती करू शकली नाही. अखेरीस ती पडून राहीली.

बाहेरून राजा आला व त्याने जुलेखांस पडून राहीलेले पाहून विचारले काय झाले? तू अशी पडून का आहेस? जुलेखांनी सांगितले की मी काय सांगू? युसुफने मला बेइज्जत केले आहे.

त्या काळी राजे खूप चांगले न्याय करीत, तसेच गुन्ह्यासाठी सजा देखील खूप कडक दिल्या जात असत. राजाने सल्लागारांना बोलावून घेतले व सांगितले की युसुफने असे काम केले आहे. त्यावर सल्लागार म्हणाले, सदरा जर पुढून फाटला असेल तर युसुफ खोटारडा आहे, तसेच सदरा मागून फाटला असल्यास जुलेखां खोटारडी आहे. युसुफला बोलावले गेले असता, प्रथम त्याने घडलेली सर्व घटना सांगितली. त्याचा फाटका सदरा पाहिला असता तो पाठीमागून फाटलेला होता.

ही गोष्ट सांगण्याचा हेतू एवढाच की ज्यांना परमात्मा प्रिय असतो, त्यांना तो सर्वत्र आढळतो. ते परमात्म्यास घाबरतात, तर आपण दुनियादार लोक दगडास घाबरतो. आपणांस कंदील प्रज्वलित करावयाचा असल्यास त्यासाठी अगोदरच कंदील, रॉकेल, वात वगैरेची तयारी केलेली असेल तर केवळ माचिसची काडी घासण्याची गरज असते. परंतु कंदील, वात, रॉकेल निरनिराळ्या ठिकाणी असल्यास कंदील प्रज्वलित करण्यास वेळ लागतो. याचप्रमाणे ज्याच्या अंतरामध्ये परमात्मा प्राप्तीसाठी खरी तळमळ असते व ज्याचे जीवन सच्चे व पवित्र असते, तो सतगुरू भेटण्यापूर्वीच परमात्म्यासमोर विनवणी करतो की माझी अशा सतगुरूंशी भेट घडव, जे माझी तुझ्याशी भेट घडवू शकतील. अशा आत्म्याचे गुरूंकडे जाणे म्हणजे कोरड्या दारूगोळ्यास आगीच्या जवळ नेण्यासारखे असते.

सेव करीं पल चसा न विछड़ां जन नानक दास तुमारे जीओ।।
हौं घोली जीउ घोल घुमाई जन नानक दास तुमारे जीओ।।

***

धन्य अजायब

परमसंत अजायब सिंह महाराजांच्या मधुर आठवणीतील
सन्तबानी आश्रम, १६ पी एस राजस्थान व मुंबई येथील कार्यक्रमांची माहीती

सन्तबानी आश्रम १६ पी एस राजस्थान येथील कायक्रम

२३ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर २०१५
२७ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०१५
२५ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०१५

मुंबई शहरातील सत्संगाचा कार्यक्रम

६ जानेवारी ते १० जानेवारी २०१६